ISSN No. 2394-9996

# New Vision

## Multi-disciplinary Research Journal

January 2017

Online version : http://www.milliyaresearchportal.com

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned by CamScanner

| Sr. No. | Title of Research Paper | Author | Sub | P.No. |
|---|---|---|---|---|
| 14 | अल्मा कबूतरी में चित्रित संघर्षशील नारी | प्रा. डॉ. चित्रा धामणे | हिंदी | 54 |
| 15 | विज्ञापन में नारी का अस्तित्व | प्रा.आहेर संगीता एकनाथराव | हिंदी | 57 |
| 16 | विकलांग-विमर्श कारण तथा चुनौति | डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर | हिंदी | 60 |
| 17 | 'जनता का मोर्चा' नाटक में साम्प्रदायिक सद्भाव एवं राष्ट्रीय एकात्मता | प्रा. संतोष नागरे | हिंदी | 64 |
| 18 | धूमिल के काव्य में जनवादी चेतना | डॉ. सय्यद अमर फकिर | हिंदी | 67 |
| 19 | 'जीवन हमारा' में व्यक्त शोषण, दमन और रूदन | प्रा. प्रकाश गायकवाड | हिंदी | 71 |
| 20 | शांता शेळके यांची भाषाशैली | डॉ. सरकटे सदाशिव | मराठी | 75 |
| 21 | 'संभूती' कृषी जीवनाशी निगडीत स्त्रीच्या जीवनातील फरफट रेखाटणारी कादंबरी | स.प्रा. ढास रवींद्र | मराठी | 81 |
| 22 | दलित साहित्यातील मानवता | प्रा. नामदेव शिनगारे | मराठी | 84 |
| 23 | दौलताबाद शहराचे महत्त्व | डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | इतिहास | 89 |
| 24 | मुक्ती संग्रामातील योध्दा | प्रा. हुसेन ईमाम<br>प्रा. मोहन जगन्नाथ काळकुटे | इतिहास | 92 |
| 25 | नवभारत निर्मितीत स्वामी विवेकानंदाचे शक्तीदाय विचार | प्रा. श्रीमती सुनिता शंकरराव कुरूडे | इतिहास | 94 |
| 26 | सामाजिक समायोजनामध्ये वर्तन एक महत्त्वपूर्ण घटक | प्रा. मलेका शाहिन अब्दुल गफार | गृह विज्ञान | 98 |
| 27 | " सावित्री फुलेंचे स्त्री चळवळीतील योगदान व आजची महिला " | प्रा. जाधव एस.बी. | गृह विज्ञान | 100 |
| 28 | "संत साहित्यातील आहार विचार " | डॉ. शिल्पा खोत-देशपांडे | गृह विज्ञान | 104 |





Scanned by CamScanner

ISSN No.2394-9996

# ``सावित्रीबाई फुलेंचे स्त्री चळवळीतील योगदान व आजची महिला``

प्रा. जाधव एस.बी.
गृहविज्ञान
मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र
महाविद्यालय, बीड.

भारतीय समाज हा पुरूषसत्ताक आहे. स्त्री ही त्यामुळे नेहमीच दुय्यम स्थानावर राहिली. विश्वाच्या निर्मितीचेही श्रेय पुरूषांकडे जाते. विश्वनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग नाकारला गेला. पण पुरूषसत्ताक समाजाच्या आधी भारतीय समाज हा स्त्रीसत्ताक होता. हे सिध्द झाले आहे. वैदिक युगाच्या आगोदरचा मातृसत्ताक कालखंड हा स्त्रियांचे सुवर्ण युग होता.

गाळापेराच्या सुपीक शेतीचा शोध स्त्रियांनी लावला तेव्हा ती ज्ञानापासून वंचीत नव्हती. निसर्गाच्या साहय्याने अनुभवातून ती समृध्द होत होती. पुढे-पुढे स्त्रीसत्ताक समाजाचा पराभव आणि पुरूषसत्ताक समाजाचा उदय झाला. या कालखंडातं स्त्रिया दुय्यम स्थानावर फेकल्या गेल्या आणि स्त्री शोषणाच्या इतिहासाला सुरूवात झाली. वैदिक काळातील गार्गी मैत्रेयी या उच्च कुळातील स्त्रियांचा अपवाद वगळता सर्वसामान्य स्त्री मात्र आदृश्यच राहिली. चार्तुर्ण्यव्यवस्थेचा उदय आणि ब्राम्हण वर्गाची सत्ता यामुळे स्त्री जीवन पार रसातळाला गेले.

ज्ञान आणि सत्ता यांच्या चाव्या ब्राम्हण वर्गाने आपल्याकडे ठेवल्या. जाती व्यवस्था शाबुत ठेवण्यासाठी स्त्रियावरची बंधने अधिक घट्ट करण्यत आली. त्यामुळे समाजाचा स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलला धर्म प्रभावामुळे स्त्रीचे महत्त्वकमी होत गेले. स्त्री व शुद्र समान समजले गेले. त्यामुळे स्त्रियांना शिक्षणापासून वंचीत राहावे लागले. ``चुल आणि मुल`` हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र ठरून गेले. कौटुंबीक व सामाजिक आन्यायाच्या बळी ठरल्या अनेक हक्कापासून वंचीत ठेवण्यात आले.

इतकेच नाही तर स्त्री पुरूषाच्या मार्गातील अडसर आहे. या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. आणि हा दृष्टीकोन हानून पाडण्याचे काम महात्मा ज्योतिबा फुलेंनी केले. ते असे, शिक्षण सामाजिक क्रांतीचे एक प्रमुख साधन आहे. समाज परिवर्तनाचे सामर्थ्य शिक्षणात आहे. हे ज्योतीरावांनी ओळखले आणि स्त्रीयांना नाकारलेले हक्क मिळावेत व त्यांना सन्मानजनक वागणूक मिळावी हया करिता त्यांनी स्त्री शिक्षणाचे कर्य हाती घेतले.

विधेविणा मति गेली, मति विणा नीती गेली
नीतीविणा गती गेली, गती विणा वित्त गेले;
वित्ताविणा शुद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले.

हे ज्योतीरावांनी ओळखले होते. आणि म्हणून शिक्षण हा प्रत्येक मानवाचा मुलभूत हक्क आहे. ज्यावेळी हक्कांची पायमल्ली होते तेव्हा समाजात दुफळी माजते आणि सामाजिक प्रगती थांबते मनुष्याची अस्मिता व अस्तित्त्व शाबुत ठेवून त्याला स्वावलंबनाने स्वाभीमानाने व सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे.



Scanned by CamScanner

आणि स्त्रीयांचा विकास साधावयाचा असेल तर प्रथम त्यांना शिक्षित केले पाहिजे असे ज्योतीबांचे मत होते. त्या अनुषंगाने १८४८ मध्ये पुण्याचया बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. तेथे मुर्लींना शिकवण्यासाठी कुणाची नेमणूक करावी असा प्रश्न पडला.

या नंतर एका ऐतिहासीक पर्वाच्या प्रारंभाला सुरूवात होते. आधुनिक भारतीय स्त्री शिक्षणाच्या इतिहासाचा पाया घरापासून रचला जातो. मानवी जीवनाच्या एका उपेक्षित घटकाला ज्ञान देण्याच्या कार्याला प्रारंभ होतो. सखाराम यशवंत परांजपे आणि सखाराम केशव शिवराम भवाळकर सावित्रीबाईना घरीच शिक्षण देतात. विवाहापूर्वी शाळेची पायरी न ओलांडणाऱ्या मात्र ज्योतीरावाचे रखडलेले शिक्षण सुरू झाल्यामुळे सावित्रीबाई आणि सगुणाबाई क्षीरसागर यांना शिक्षणाची गोडी निर्माण झाली. ज्योतीराव देखील सावित्रीला यांच्या फावल्या वेळात धुळपाटीच्या साहयाने बाराखडी शिकवित असत. कुशाग्र बुध्दी व अध्यापन क्षेत्रातील जिज्ञासा आणि चिकाटी पाहून ज्योतीरावांनी अध्यापनाचा कोर्स पूर्ण करण्याचा सल्ला दिला. आणि सन १८४७ मध्ये उत्तमशिक्षिका म्हणून बाहेर पडल्या.

आशापध्दतीने या देशातील त्या पहिल्या शिक्षिका आणि नंतर मुख्याध्यापिका झाल्या. येथुन पुढे त्यांच्या शैक्षणिक चळवळीची सुरूवात झाली गुलामीचे भान आणि स्वातंत्र्याचे मोल जाणणाऱ्या सावित्रीबाईच्या वर्गातील मार्गदर्शनाचा विद्यार्थीनीवर प्रभाव पडू लागला. विद्यार्थी संस्कारक्षम घडू लागले. याच सुमारास ज्योतीबाईंनी ``महिला सेवामंडळ`` नावाची एक संस्था स्थापन केली. आणि मंडळाच्या सचिव सावित्रीबाई होत्या तर पुण्याचे कलेक्टर ज्योन्स यांच्या पत्नी मिसेस जोन्स या अध्दक्ष होत्या. या संस्थेच्या वतीने १८५२ च्या संक्रातीला तीळगूळ वाटप समारंभ करण्यात आला. सर्व जातीधर्मांच्या स्त्रियांना या कार्यक्रमास निमंत्रित करण्यात आले व यात सर्वाना समान मानून हाळदी-कुंकू वाटण्याचे आश्वासन दिले हळदी कुंकू कार्यक्रमात समतेची जोपासना केली.

प्रशिक्षित शिक्षिका सावित्रीबाईच्या लक्षात आले की, येथील समाजव्यवस्थेच्या भिंती अतिशय मजबूत आहेत आणि या भिंतीत सर्वात जास्त स्त्री गुदमरली असून तीला मोकळा श्वास घेता यावा म्हणून काही तरी केले पाहिजे, चार भिंतीच्या आतील शालेय शिक्षणासमवेत आणखी जास्तीचे कार्य स्त्रीयांसाठी करणे जरूरीचे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणून जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेली स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटणारी देशातील ही पहिली संस्था होय. आखिल भारतीय पातळीवर महिलांसाठी कार्यरत असणाऱ्या संस्थेंत समाजक्रांतीची सुरूवात त्याकाळी एका बहुजन स्त्रीने करणे म्हणजे एक धाडसच होते. या संदर्भात हरी नरके यांनी म्हटले आहे की, ``त्यांनी शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या `सार्वजनिक जीवनाची` सुरूवात होय.``

महात्मा ज्योतीराव फुले आणि सवित्रीबाईंनी दीडशे वर्षापूर्वी स्त्री-पुरूष समता आणि सामाजिक न्याय यांची चळवळ उभारण्यासाठी कडवी झुंज दिली. आजच्या युगातील साक्षरता अभियान ही चळवळ १८५४-५५ मध्ये यांनी सुरू केली. फसविल्या गेलेल्या ब्राम्हण विध्वांच्या बाळातपणासाठी आणि त्यांच्या मुलांच्या संगोपणा करिता १८६३ साली स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. सावित्रीबाईंनी नाडल्या गेलेल्या विध्वासाठी काम सुरू केले. अनेक तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी जाहिराती लावलया

ब्राम्हण विधवासाठी आश्रम ही जाहिरात पाहून विविध ठिकाणाहून आलेल्या ३५ ब्राम्हण विधवांचे बाळांतपण आपल्या आश्रमात केले व हे विधवांसाठी मनोबल ठरले.

सावित्रीबाईंना मूल होत नाही. म्हणून काशीबाई नावाच्या विधवा पिडीत ब्राम्हणस्त्रीचे बाळांतपण करून ते मूल स्वतः दत्तक घेतले. त्याला वैद्यकिय शिक्षण देऊन डॉक्टर केले व त्यांच्या मदतीने ज्योतीरावांच्या पाश्चात सत्यशोधक चळवळीची पताका फडकवत ठेवली.

त्यांनी केलेल्या योगदानामुळेच आज स्त्रीयाचा विकास झालेला आहे आणि होत आहे. म्हणून आजची स्त्री समाजापुढे जाती धर्माच्या भिंतीला हादरे देऊन ताठ मानेने उभी राहून पुरूषांशी स्पर्धा करू लागली आहे. या बरोबर स्त्रीयांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करूण देणाऱ्या त्यांचे शोषण करणाऱ्या अनेक संघटना उभारून अन्याय आत्याचाराच्या दिरोधात लढे उभारण्याचे व चळवळी चालवण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. फुलेदापत्यांनी बहुजन समाजाला योग्य दिशा देऊन साऱ्या समाजाला आयुष्यभर प्रकाश देवुन सर्वांचे जीवन प्रकाशीत केले आहे. आयुष्यभर धडपडणाऱ्या आणि सातत्याने संघर्ष करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाईची जीवनज्योत समाजसेवा करता करता प्लेग होऊन १० मार्च १८८७ रोजी मालवली.

अशा प्रकारे सावित्रीबाईंनी संपूर्ण जीवन स्त्रीयांच्या उध्दारासाठी शिजविले त्यांनी स्त्रीयांना मिळवून दिलेल्या अधिकारामुळे आधुनिक युगातील स्त्रीया समर्थपणे कार्य करीत आहेत. सावित्रीबाईमुळे स्त्रीयांना सन्मानाचा व समानतेचा दर्जा प्राप्त झाला आहे. परंतू आजूनही ग्रामीण भागातील बहुतांश महिलांना सनमानाचा दर्जा प्राप्त नाही. ज्यास्त्री चळवळी झाल्या त्यांचे क्षेत्र शहरी भागापूरतेच मर्यादीत राहिले आहे. ग्रामीण भाग मात्र अजूनही बराच दूर आहे. त्यामुळे विकासाचे विचार त्यांच्यापर्यंत पोहचविण्याची गरज आहे.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे राहून सुध्दा आपण हे जाणून घेतले नाही तर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही. इतिहास साक्षिला आहे कि आपण कधीही स्वतःला विज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहिले नाही. त्यामुळे अवकाशातील गृहांवर धाव घेणाऱ्या महिलामध्ये व हाती दोरा धरून झाडाला पून्हा-पून्हा फेऱ्या मारणाऱ्या महिलामध्ये काय फरक आहे. हे समजून घेण्याचे भान आम्ही हारवलेले आहे. असे वाटते.

या शिवाय काही मुद्दे विचारात घेतले तर आपण खऱ्या अर्थाने २१ व्या शतकात पाऊल टाकले असे म्हणता येईल.

(१) जुन्या व कालबाह्य रूढी

(२) कर्मकांड

(३) अंधानुकरण

(४) दैववाद

(५) पुनर्जन्म

(६) आत्मविश्वास

(८) आज्ञान



Scanned by CamScanner

हे फेटाळून लावले पाहिजेत. ह्या सर्व गोष्टी करणाऱ्यासाठी महत्त्वाची आडचण म्हणजे आज्ञनच आहे असे आज्ञान हे अध:काराचे दूसरे रूप आहे. त्यामध्ये माणसाचे अस्तित्त्व संपून जाते. म्हणून आज्ञानाला समूळ नष्ट करणे. हे आपले आद्य कर्तवय मानले पाहिजे व फुले आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाची कास धरावी. शिक्षणानेच मती येते गती येते व आपण विश्वाच्या स्पर्धेत ठाम उभे राहु शकतो.

**निष्कर्ष :-**

(१) महिलांच्या मनातील दुय्यम स्थान नष्ट होईल.

(२) ग्रामीण भागातील महिला पर्यंत स्त्री मुक्तीचा विचार पोहचला नाही.

(३) सावित्रीबाईंनी शिक्षणची ज्योत लावली.

तरी स्त्रियांमधील अंधश्रध्दा दूर होताना दिसत नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

(१) सावित्रीबाई फुले - जी. ए. उगले

(२) मी सावित्री - यशवंत मनोहर

(३) समाज आणि महिला - डॉ. निलमगोरे

(४) भारतीय नारी - डॉ. तीवारी आर.पी.

(५) महाराष्ट्रातील समाज सुधारक - के. सागर

(६) स्त्रि शिक्षणाचा संघर्ष - दिलीप चव्हाण.



Scanned by CamScanner